# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १२८ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०९ आषाढ शके १९४८, मंगळवार दि.३० जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## तिच्या जिद्दीपुढे अपंगत्वही थिटे पडले

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

शारीरिक किंवा मानसिक मर्यादांवर मात करून यशाला गवसणी घालणाऱ्या स्त्रीच्या अदम्य इच्छाशक्तीचे हे एक सुंदर वर्णन आहे. अपंगत्वापेक्षा माणसाची जिद्द किती मोठी असू शकते, हे दर्शवणारी माऊलीची ही कहाणी..

प्रत्येक कठीण प्रसंग आपल्याला एक नवीन धडा शिकवतो.या विचाराने आपल्याला अडचणींचा धैर्याने सामना करण्याची ऊर्जा मिळते.कठीण प्रसंग हे आपले सर्वात मोठे शिक्षक असतात. अडचणींचा सामना करताना त्यातून मिळणारा अनुभव आपल्याला अधिक कणखर आणि सक्षम बनवतो.

जिद्द,आत्मविश्वास,परिश्रम संयम, समर्पण असले की कोणतेही शिखर गाठता येते. अशीच एक प्रेरणा देणारी कहाणी आहे माऊली बळवंत आडकूरची

दोन्ही हात नसतानाही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर बृहन्मुंबई महानगरपालिकेत सहायक कार्यकारी अधिकारी बनलेल्या महिलेचे नाव माऊली बळवंत आडकूर आहे.

मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील (पोर्ले तर्फ ठाणे) रहिवासी असलेल्या माऊली यांनी शारीरिक अपंगत्वावर मात करत स्पर्धा परीक्षांद्वारे हे यश संपादन केले आहे. त्यांनी आपल्या पायाने लिहून परीक्षा उत्तीर्ण केली आणि लाखो लोकांसाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. जन्मजात दोन्ही हात नसतानाही तिने तिच्या अदम्य इच्छाशक्ती आणि परिश्रमाच्या जोरावर हे घवघवीत यश संपादन केले आहे.

जन्मापासूनच दोन्ही हात नसलेल्या माऊलीने कधीही हार मानली नाही. तिने आपल्या पायांनी लिहिणे, संगणक चालवणे, स्वयंपाक करणे आणि हार्मोनियम वाजवणे आत्मसात केले.तिने दहावीच्या परीक्षेत ७५% गुण मिळवले. त्यानंतर सरकारी पॉलिटेक्निकमधून कॉम्प्युटर डिप्लोमा आणि वाणिज्य शाखेतून पदवी पूर्ण केली. सध्या ती मानसशास्त्रातून पदव्युत्तर शिक्षण घेत आहे.

सुरुवातीला अनेक शाळांनी तिला प्रवेश देण्यास नकार दिला होता. मात्र, कुटुंबियांच्या (विशेषतः आजी आणि आई-वडील) खंबीर पाठिंब्यामुळे तिने शिक्षण सुरू ठेवले. जळगाव येथील दीपस्तंभ फाउंडेशनच्या माध्यमातून तिने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. अनेकदा अगदी १-२ गुणांनी संधी हुकली, तरीही तिने जिद्द सोडली नाही. शेवटी सरळसेवा परीक्षेत यश मिळवून तिची मुंबई महापालिकेत वर्ग-१ च्या सहायक कार्यकारी अधिकारी पदावर निवड झाली.

माणसाकडे शारीरिक शक्ती किती आहे यापेक्षा त्याची मानसिक शक्ती किती मजबूत आहे, यावर त्याचे यश अवलंबून असते. जेव्हा एखादी व्यक्ती मनातून काहीतरी मिळवण्याचा ठाम निश्चय करते, तेव्हा निसर्गाचे नियमही तिच्यासमोर झुकतात.संकटांवर मातअपंगत्व हे शरीराला येऊ शकते, मनाला नाही. अनेकदा शारीरिक कमतरतेमुळे लोक खचून जातात, पण काही अशा जिद्दी व्यक्ती असतात ज्या या परिस्थितीला आपली कमजोरी न बनवता आपली ताकद बनवतात. त्या कधीही सहानुभूतीची अपेक्षा करत नाहीत, तर स्वतःच्या कर्तृत्वाने जगाला थक्क करतात.माऊलीची कहाणी देखील अशीच आहे. अपंगत्व घेऊन रडत बसली नाही शांत बसली नाही, अभ्यास करत राहिली. पुढे जात राहिली यश संपादन करत राहीली. आज अधिकारी बनली.

संकटांमुळे आपली खरी ताकद समजते. प्रत्येक अडचणीवर मात केल्याने आत्मविश्वास वाढतो.कठीण काळ आपल्याला अपयशाची कारणे शोधून नवीन मार्गाने प्रयत्न करायला शिकवतो.आजचा अनुभव भविष्यातील मोठ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपल्याला तयार करतो.आयुष्यातील चढ-उतार हे अटळ आहेत. प्रत्येक कठीण प्रसंग आपल्याला यशाच्या अधिक जवळ घेऊन जातो.

शारीरिक अपंगत्वावर मात करणारी जिद्द ही कोणत्याही पर्वतापेक्षा मोठी असते. संकटे कितीही मोठी असली, तरी आत्मविश्वासाच्या बळावर त्यांच्यावर विजय मिळवता येतो, हेच माऊलीच्या प्रेरणादायी कहाणीवरून दिसून येते.

# संस्कारक्षम शिक्षणातूनच घडतात सक्षम नागरिक-डॉ. प्रेरणा उबाळे

ज्योतिर्मय साहित्य

**सातारा – लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी-कुशी येथे उपशिक्षक शशिकांत जाधव यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ भावपूर्ण सत्कार; ३१ वर्षांच्या समर्पित सेवेला मानाचा मुजरा**

लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था, सातारा संचलित लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी-कुशी (ता. जि. सातारा) येथील ज्येष्ठ उपशिक्षक शशिकांत साहेबराव जाधव यांनी तब्बल ३१ वर्षांच्या प्रदीर्घ, समर्पित आणि विद्यार्थीकेंद्री सेवेनंतर सेवानिवृत्ती स्वीकारल्याबद्दल त्यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ शनिवारी (दि. २७) उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. या वेळी ''हिंदी भाषेमुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून संस्कारक्षम शिक्षणातूनच सक्षम नागरिक घडतात,'' असे प्रतिपादन सहाय्यक प्राध्यापक, अध्यक्ष हिंदी विभाग मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पुणे डॉ. प्रेरणा उबाळे यांनी केले. त्या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिरीष चिटणीस होते. प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस, सातारा जिल्हा परिषदेचे सदस्य सर्जेराव (नाना) सावंत, माजी सैनिक व निवृत्त पोलीस अधिकारी चंद्रकांत जाधव, कोरेगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रशांत जाधव, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. प्रेरणा उबाळे यांनी आपल्या भाषणात शिक्षणातील संस्कार, शिक्षकांचे योगदान आणि हिंदी भाषेचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, ''संस्थापक अध्यक्ष शिरीष चिटणीस यांच्या दूरदृष्टी, जिद्द आणि शिक्षणावरील निष्ठेमुळे ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मजबूत परंपरा निर्माण झाली आहे. शशिकांत जाधव यांनी तीन दशकांहून अधिक काळ विद्यार्थ्यांसाठी निस्वार्थ भावनेने कार्य केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांचे समर्पण किती महत्त्वाचे असते, याचे ते उत्तम उदाहरण आहेत.''




त्या पुढे म्हणाल्या, ''विद्यार्थ्यांच्या मनात मूल्यसंस्कार रुजविण्याचे कार्य शिक्षक करतात. शालेय जीवनात शिक्षकांकडून मिळालेले संस्कार आयुष्यभर साथ देतात. जाधव सरांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि जिद्द निर्माण केली. त्यांनी आयुष्यभर कमावलेली माणसे ही कोणत्याही आर्थिक संपत्तीपेक्षा मोठी आहेत.''

हिंदी भाषेच्या महत्त्वावर भाष्य करताना डॉ. उबाळे म्हणाल्या, ''आज जागतिक स्तरावर हिंदी भाषेला महत्त्व प्राप्त होत आहे. चीनसारखा देशही हिंदी भाषा शिकवत आहे. देशातील उद्योग, सेवा, पर्यटन, माध्यमे आणि शासकीय क्षेत्रात हिंदी जाणणाऱ्या युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी इंग्रजीबरोबरच हिंदी भाषेचेही ज्ञान आत्मसात करणे काळाची गरज आहे.''

अध्यक्षीय समारोपात शिरीष चिटणीस यांनी जाधव यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, ''निवृत्ती म्हणजे कार्याचा शेवट नसून नव्या सामाजिक जबाबदाऱ्यांची सुरुवात आहे. जाधव सरांनी पुढील काळातही विद्यार्थ्यांना क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी मार्गदर्शन करावे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या शाळेतील विद्यार्थ्यांनी कबड्डी, खो-खोसह विविध क्रीडा प्रकारांत तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले.''

ते पुढे म्हणाले, ''लोकमंगल संस्था शिक्षकांवर विश्वास ठेवते आणि त्यांना काम करण्याचे स्वातंत्र्य देते. त्यामुळेच या शाळेतील अनेक विद्यार्थी आज नेव्ही, मिलिटरी, एअरफोर्स तसेच इन्फोसिससारख्या नामांकित संस्थांमध्ये कार्यरत आहेत. या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण परिश्रम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ आहे.''

संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस म्हणाल्या, ''निवृत्ती म्हणजे आयुष्याची सांगता नसून अनुभव समाजाला परत देण्याची सुवर्णसंधी आहे. जाधव सरांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि निस्वार्थ सेवा या मूल्यांची आयुष्यभर जोपासना केली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.''

मुख्याध्यापक विजय यादव यांनी जाधव सरांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले, ''शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनात पेरलेले संस्कारच पुढे समाजात फ ुलत असतात. जाधव सरांचे विचार आणि कार्यपद्धती प्रत्येक शिक्षकासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी या शाळेशी असलेले नाते भविष्यातही कायम ठेवावे.''

कोरेगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रशांत जाधव यांनी जाधव यांच्या यशस्वी सेवाकाळाबद्दल समाधान व्यक्त करून त्यांच्या भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या.

माजी विद्यार्थिनी व शिक्षिका दुर्गा खंडजोडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ''आज मी स्वतः शिक्षिका म्हणून कार्यरत असताना जाधव सरांचा आदर्श माझ्यासमोर असतो. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रीडेची आवड निर्माण केली आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस दिले. त्यांनी आम्हाला केवळ खेळ शिकवला नाही, तर शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वासही दिला.''

यावेळी आदित्य जाधव, सुनिता निकम, महेश टिळेकर, मिताली अमित जाधव आणि आशा चंद्रकांत जाधव यांनीही मनोगते व्यक्त करून जाधव सरांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना शशिकांत जाधव भावुक होत म्हणाले, ''लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेने मला सतत नवनवीन शिकण्याची प्रेरणा दिली. संस्थेने माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि व्यक्त केलेल्या भावना सार्थ ठरविण्याचा मी प्रयत्न करेन. निवृत्तीनंतरही विद्यार्थ्यांसाठी कार्यरत राहण्याची माझी तयारी आहे. हिंदी विषयाची उणीव विद्यार्थ्यांना भासू देणार नाही. या संस्थेचे, सहकाऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे आणि ग्रामस्थांचे ऋण मी आयुष्यभर मानत राहीन.''

कार्यक्रमाच्या प्रारंभी रमेश महामुलकर व श्रीनाथ सावंत यांनी तबला-पेटीच्या साथीवर स्वागतगीत सादर केले. या वेळी डॉ. प्रेरणा उबाळे यांनी हिंदी व्याकरण रचना हा ग्रंथ लोकमंगल विद्यालयाला सप्रेम भेट देण्यात आला.

समारंभात शशिकांत जाधव व त्यांच्या सुविद्य पत्नी वैशाली शशिकांत जाधव यांचा लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था तसेच नेले ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

समारंभास मुख्याध्यापक विजय यादव, कल्याण भोसले, काकासो निकम, भास्कर जाधव, यू. जी. जाधव, बाळकृष्ण इंगळे, सतीश पवार, विपुल लोहार, ज्ञानेश्वर मोहटकर, संदीप जाधव, हणमंत खुडे, चंद्रकांत देवगड, जगदीश खंडागळे, दत्तात्रय शिर्के, महेश टिळेकर, सयाजी पाटील, मंगेश पाटील, आयुब मोकाशी, महादेव जाधव यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामस्थ, पालक आणि आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक शशिकांत जमदाडे यांनी केले. सूत्रसंचालन गुलाब पठाण यांनी, तर आभार नितीनकुमार कसबे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शशिकांत जमदाडे, नितीनकुमार कसबे, राहुल घोडके आणि रमेश महामुलकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संस्कृत का महत्वाचे आहे?

ज्योतिर्मय साहित्य

संस्कृत का महत्वाचे आहे हे समजण्याकरिता आपण जगातील प्रमुख भाषातील शब्द संख्येकडे एक दृष्टीक्षेप टाकू.

१. क्र. भाषा एकूण शब्द यांप्रमाणे
१ - संस्कृत - १०,२७,८५,००,,
२ - जर्मन - ५०,३०,०००
३ - अरेबिक - १२,००,०००
४ - कोरियन - ११,००,०००
५ - इंग्रजी - १०,००,०००
६ - पोर्तुगीज- ८,१८,०००
७ - फ्रेंच - ८,००,०००
८ - जपानी - ५,००,०००
९ - इटालियन - ५,००,०००
१० - रशियन - २,००,०००
स्त्रोत: गुगल

आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्रीमान नरेंद्रभाई मोदीजी त्यांच्या ''मनकी बात'' या कार्यक्रमात नेहमी किमान एकतरी संस्कृत श्लोक उद्धृत करत असतात. कुठली ही संस्कृति त्या ठिकाणच्या मूळ भाषेशिवाय जीवंत राहू शकत नाही, आणि म्हणूनच इंग्रजांनी अगदी जाणून बुजून प्रयत्नपूर्वक संस्कृत भाषा नष्ट करण्याचे प्रयत्न केले व त्याचा परिणाम म्हणजे एवढ्या खंडप्राय देशात २०११ च्या जणगणणे प्रमाणे भारतात केवळ २४,८२१ जणांची मातृभाषा संस्कृत आहे. भारताच्या लोकसंख्येच्या फक्त ०.००२ % लोकच संस्कृत बोलतात.

आपल्यालाच आपल्या संस्कृतीचे संरक्षण करावे लागेल, दुसरे कुणीही बाहेरून येऊन हे काम करणार नाही. ज्ञानाचे प्रचंड भांडार संस्कृतमध्ये उपलब्ध आहे. त्यात अनेक शास्त्राविषयी; जसे, विमानशास्त्र , खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, त्रिकोणमिती, भूमिती, काव्यशास्त्र, गाणित, अवकाशशास्त्र, खणीजशास्त्र, आरोग्यशास्त्र,




औषधी निर्माणशास्त्र, भाषाविज्ञानशास्त्र वगैरे विषयांचे विशाल ज्ञानसागर आहे. आपण संस्कृत शिकलो नाही तर आपण आपल्या पुढील पिढीला हे ज्ञान भांडार आहे हे तरी कसे सांगू शकणार?

संस्कृत भाषा किती समृद्ध हे वाचकांना वरील तक्ता पाहून लक्षात आलेच असणार. सर्वांच्या मनात एक प्रश्न नक्कीच येईल की इतके शब्द कसे आहेत संस्कृतमध्ये.




संस्कृतमधील शब्दसंख्या

धातु म्हणजे मूळ संस्कृत शब्द. संस्कृतमध्ये असे मूळ धातू २,००० आहेत.

क्रियापदे दहा लकारात चालतात: १० दहा वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ: ९ = ९ १० = ९० नव्वद

परस्मैपद व आत्मनेपद: ९० २ = १८० - एकशे ऐंशी

धातु २००० १८० = १,८०,००० एक लाख ऐंशी हजार

उपसर्ग २२

१८०००० = ६,८०,००० सहा लाख ऐंशी हजार

धातूंची सन्नत (जोगमिषति) यङ्लुडमीति (जङ्गमीति) सारख्या रुपांचा पण यात समावेश करून किंवा त्यांना प्रत्यय जोडून बनविलेल्या नामधातूंचीही रुपे बनविली तर त्यांची संख्या ७६,६०,७९,४२० श्यहात्तर कोटी साठ लाख एकुणऐंशी हजार चारशे वीस च्या जवळपास आहे.

मुख्य कृत प्रत्यय १९ आहेत. त्यांच्या प्रयोगाने सर्व लिङ्ग, वचन वा विभक्तीच्या प्रयोगाने ७७,४९,६५,१२८ सत्याहत्तर कोटी एकूनपन्नास लाख पासष्ट हजार एकशे अठठावीस रुपे बनतात.

याचप्रकारे तद्धित प्रत्ययांच्या प्रयोगाने १५,१०,४५,८३,२०० रुपे तयार होऊ शकतात. पंधरा अर्बुद दहा दहा कोटी पंचेचाळीस प्रयुतम् त्र्यांशी लक्षम्.

याप्रकारे केवळ धातूच्या प्रयोगाने जबळपास ४२,८८,४५,८३,३३० रुपे बेचाळीस अब्ज अठ्ठ्यानशी कोटी पंचेचाळीस लाख, त्र्यांशी हजार तीनशे तीस बनतात. केवळ दोन व तीन पदांचा समास झाल्याने (जसे सस्यशामला दशप्रहरणधारिणी इत्यादि) अनंत कोटी रुपे बनू शकतात.

या सर्वांना एकत्रित करून एकूण १०,२७,८५,००,००,००० १०११ दहा निखर्वम् सत्तावीस खर्वम् पंच्यांशी अब्जम् रुपे बनू शकतात. यामध्ये सर्व अव्यय अथवा समासान्त रुपांची गणना केलेली नाही. आपण सर्व आपल्या देशाच्या अतिशय समृद्ध संस्कृत भाषेच्या प्रसाराकरिता सुरुवात स्वत:पासून करू शकतो. आधी सांस्कृत संभाषण करण्याला शिका. ते नि:शुल्क उपलब्ध आहे जगभर. त्यानंतर, तुम्ही पत्रद्वारा पुढचे शिक्षण घेऊ शकता. याच बरोबर आपले घर 'संस्कृतगृह' लगेच तयार करू शकता. अगदी सोप्पे आहे. 'शुभस्य शीघ्रम्' कोणतेही चांगले किंवा शुभ कार्य करायचे असेल, तर ते लगेच (विलंब न लावता) करावे, चांगल्या कामांना कधीही उशीर करू नये, हा मोलाचा संदेश मिळत.

***




## जात्यावरच्या ओव्या.....

अरे पड ना पाण्या
तुझी माफी मी मागते
खरं मातला माणुस
त्याला सांगुन पाह्यते ||७१७||

अरे पड ना पाण्या
तुला नही देत दोष
माणसाच्या लोभाचा
मुक्या जीवाला तरास|| ७१८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ४४




ज्योतिर्मय साहित्य

समर्थांनी जनी मौन्यमुद्रा धरावी असे म्हटले आहे. एक वेळ एकांतातील मौन सोपे आहे परंतु भोवती लोकांची गर्दी असताना सोपे नाही. विपश्यना शिबिरात तर खुणेने देखील बोलायचे नसते. अशा ठिकाणी माणसे दहा दिवस कसाबसा धीर धरतात. परंतु एकदा शिबिर संपले की दहा दिवसांची भर काढून घेतात.

जो खरा साधक असतो तो भगवंताच्या चिंतनात अंतर्बाह्य बुडालेला असतो. त्यामुळे त्याला इतर अनावश्यक बडबड करण्याची आवश्यकता भासत नाही. तो जेव्हा बोलतो तेव्हा आपल्या वाणीने भगवंताच्या गुणांचे वर्णन करतो, भगवंताचे कीर्तन करतो.



जेथे त्याला सुखाने राहून भगवंताचे गुणगान करता येते असे ठिकाण म्हणजे त्याच्या दृष्टीने स्वर्ग. परंतु अशीही काही ठिकाणी असतात की जेथे भगवंताचे चिंतन, नामस्मरण केलेले आवडत नाही. भगवंताला न मानणारी माणसे अशा ठिकाणी राहतात. अशा ठिकाणी खऱ्या भक्ताला राहणे कठीण होते. अशा ठिकाणी त्याचा आणि भगवंताचा देखील अवमान होतो. म्हणून ज्या ठिकाणी भगवंताचा अनादर होतो आहे, निंदा होते आहे असे दिसले तर ते ठिकाण तत्काळ सोडावे.

अशाप्रसंगी वनात जाऊन देखील राहण्यास हरकत नाही. तेथे सुखाने भगवंताचे नाम घेता येते. त्याच्या स्मरणात राहता येते. संत तुकाराम महाराज म्हणतात,'' येणे सुखे रुचे एकांताचा वास, नाही गुणदोष अंगा येत. आकाश मंडप, पृथ्वी आसन, रमे तेथे मन क्रीडा करी. '' साधकाला मग अशा एकांतातील सुख अनुभवता येते कुठलाही व्यत्यय न येता परमेश्वराचे नामस्मरण घडते. परमेश्वराच्या चिंतनासाठी अनेक संतांनी जनामध्ये राहणे सोडून वनामध्ये निवास केला त्याचे कारण हेच आहे.

सध्या काळ बदलला आहे. हल्ली समर्थांच्या सांगण्याप्रमाणे वनात जाऊन निवास करणे सर्वसामान्य माणसांसाठी सोपे नाही. हल्ली रोजच्या व्यवहारात शांतता मिळणे कठीण झाले आहे. तीर्थस्थानांना देखील बाजारू स्वरूप प्राप्त झाले आहे. जिथे सुखाने भगवंत चिंतन करता येईल अशा जागा मिळणे कठीण झाले आहे. अशा वेळी आरण्य सेवन याचा अर्थ एकांत सेवन असा घ्यायला हरकत नाही. ज्या ठिकाणी सुखाने आपल्याला हरीचे नाम घेता येईल असे ठिकाण म्हणजे अरण्यच असे म्हटले तर हरकत नाही.


स्वसंवाद : १) माझ्या बोलण्यात किती वेळ भगवंताचे गुणगान असते आणि किती वेळ निरर्थक गोष्टी असतात ?

२) मला भगवंत चिंतनासाठी मौन आवश्यक आहे ही गोष्ट पटते का ?

३) ज्या ठिकाणी भगवंताचा अनादर होतो अशा ठिकाणी राहणे मला जड जाते का, की मी त्याशी तडजोड करतो ?

४) माझ्या दैनंदिन जीवनात ''आरण्य'' म्हणजे एकांताची जागा कोणती आहे आणि मी ती नियमितपणे वापरतो का ?

**(क्रमशः)**





## || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ विकास

विकास म्हणजे प्रगती, विकास हा आपण केलेल्या मेहनतीचे फळ असते, चांगले कर्म, चांगली भक्ती, चांगली सेवा, चांगला सहवास आपल्या प्रगतीची वाट सोप्पी करतात.



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## प्रवचनेशेजार असतां रामाचा । दुःखाची, काळजीची, काय वार्ता ॥

ज्योतिर्मय साहित्य

ज्याला म्हणावें मी 'माझें' । त्यावर माझी सत्ता न गाजे ।। स्वत:चा नाहीं भरंवसा हें अनुभवास येई । परि वियोगाचें दुःख अनिवार होई ।। तुम्ही विचारी, सुज्ञ आहांत । थोडासा करावा विचार ।। सर्व सत्ता रामरायाचे हातीं । तेथें आपल्या मानवाची काय गति ? ।। विचारानें दुःख सारावें । सर्वांचें समाधान राखावें ।। सर्व केलें रामार्पण । हा नव्हे शब्दांचा खेळ जाण । अर्पण केल्याची खूण । न लागावी काळजी तळमळ जाण ।। परमात्म्याचे रक्षण । कोणतेही स्थळीं, कोणतेही काळीं, असतें हा भरंवसा। याचा अनुभव प्रत्येकास आहे खासा ।। ठेवा रामावर पूर्ण विश्वास । न करावे उपासतापास।। उपास हा शब्द अलिकडील जाण । त्याच्यापुढें एक पाऊल टाकून । उपासनेंत राहावें आपण । तेथें आहे निर्धास्तपण । उपासापुढील ठाण । उपासना मुख्य जाण ।। उपासनेंत राहावें आपण । हेंच रामाचें सान्निध्य जाण ।। शेजार असतां रामाचा । दुःखाची, काळजीची काय वार्ता ? । जैसा सूर्य प्रकाशतां । काळोखाचा नाश होईल तत्त्वता । एवढें आता ऐकावें माझें । राम उतरील सर्व ओझें ।। स्मरतां रामाला । तो देईल समाधानाला ।। देवाकडे करावी विनंति । देहदुःख अति फार । होई रामाचा विसर । आतां द्या नामाचें अखंड स्मरण । देवा, देह केला तुला अर्पण ।। परमात्मा दयाळू फार । आपले हिताचें करील हा ठेवावा निर्धार ।। मी आहे तुमच्यापाशीं हा ठेवावा विश्वास। न सोडावा आतां धीर । सदा घ्या भगवंताचें नाम । जेणें कृपा करील रघुनंदन ।। राम कृपाळू, दीनांचा नाथ । तो सर्व कांहीं पाहात ।। आपले प्रारब्धानें आलेलें कर्म । ते त्यास न विसरतां करावें अर्पण ।। सुखानें घ्या नामस्मरण । कृपा करील रघुनंदन ।। हा करावा उपाय । तोच समाधानाला नेईल खास ।।

मागील गोष्टींची आठवण । पुढील गोष्टींचें चिंतन । हेंच दुःखाला खरें कारण ।। स्वार्थ म्हणजेच आपलेपण । म्हणून माझा मीच दुःखाला कारण ।। आपण आपलेपणानें वागत गेलें । सुख, दुःख, चिंता, शोक यांचे मालक व्हावें लागलें ।। सुखदुःखांत चित्ताची न राहे स्थिरता ।। तीच त्याची खरी अवस्था ।। सुखदुःख परिस्थितीवर नसतें । आपल्या जाणीवेवर अवलंबून राहतें ।। दुःखाचें मूळ कारण। जगत  सत्य मानलें आपण ।।

जोपर्यंत देही मी ही भावना । तोपर्यंत दुःखाच्या यातना ।। सारांश, देहातादात्मक । याचेंच नांव दुःख ।।

**

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

श्री हनुमानांची स्वभाव वैशिष्ट्ये

माणसाची पारख :

पुढे........

या भीतीपोटी हे सर्व पर्वतावरील गुहेत जाऊन लपले. ही त्यांची भयावस्था पाहून हनुमान समोर आले. त्यांनी प्रथम या वानरांना शांत केले, सांत्वना दिली. सुग्रीवास त्यांनी सांगितले की, आपली आज्ञा असेल तर मी, ते कोण आहेत? याची परीक्षा करून येतो. त्याप्रमाणे हनुमानांनी एका ब्रह्मचाऱ्याचा वेश धारण केला व हनुमान, ते राम व लक्ष्मण ज्या झाडाखाली थांबले आहेत, त्या झाडावरच लपून यांचे निरीक्षण करू लागले.

हनुमान विचार करतात हे तपस्वी च्या वेशात दिसतात, पण हातात धनुष्यबाण आहे. त्यांच्या चेहऱ्यावर क्रोध ही दिसतो आहे. यांना त्रि देव म्हणावे तर हे तर दोघेच आहेत. यांच्या देहबोली वरून हे श्रेष्ठ धनुर्धर दिसतात. यांना पाहून असे वाटते की, यांना काहीतरी व्यथा आहे . ही व्यथा सामान्य नसावी. हे स्वर्गातील देव म्हणावेत तर मानव रूपात आहेत कदाचित त्यांच्या अत्यंत जवळची एखादी वस्तू हरवली आहे, की जिचा ते शोध घेत असावेत. हे क्रोधित आहेत पण कुपीत नाहीत. यांना पाहून रानटी हत्ती सुद्धा आपल्या बछड्यांना पहावे, असे प्रेमभराने पहात आहेत. वाघ सिंह सारखे हिंस्त्र  प्राणीही यांच्या पाठोपाठ पाळीव श्वाना प्रमाणे जात आहेत. यांना सावली देण्यासाठी मेघ वरून  छत्र धरीत आहेत. अथवा हलकीशी अमृत वर्षाही करीत आहेत. यावरून हे धर्म देवता असावेत. अथवा तेच भगवान आहेत

क्रमशः........




### आनंदी व ऊदासी वृत्ती म्हणजेच तरंग

आपण बोलताना नेहमी अनुकूल व प्रतिकूल परिस्थितिविषयी बोलतो. पण दोन्ही वेळी जो शांत राहून कार्ये करतो तो सुखी. जो निराश न होता संकटासी दोन हात करतो, त्यातून मार्ग काढतो तो दुःखी होत नाही. अन्न किंवा खायला नसेल तर म्हणजे दुष्काळ मारेल, पण संस्कार व नितीमत्ता मानवतेला मारते. मानवतेसाठी येशू मरणाला सामोरे गेले! म्हणून संस्कार व सदाचार यासारखी वशीयत नाही व ईमानदारी ही विरासत होय! जो दुसर्याला आनंद देतो, त्याला आशीर्वाद मिळतो. व दुःख देणार्याना शाप! म्हणजे सुख व दुःख केव्हा येते तर आपले वागणं, भावना व ईगो अशा बाबतीत पूर्ण अपूर्ण याची जाणीव होते तेव्हा. "जे जेवढे आहे, तेवढे तसे ते नाही" यामागे या लाटा तरंग येतात. म्हणून आपण आपल्या सदराला नाव सुख दुःखाचे तरंग हे दिले आहे. तरंग म्हणजे भावना, लाटा.. त्या कशा येतात ? का येतात? काय परिणाम करतात? इ.विषयी चर्चा म्हणजे माझे हे लिखाण आवडले तर लाईक, शेअर करा आणि वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. गूड़ डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो.




## पुजेसाठीचा कापूर - बहुगुणी, प्रभावी आणि आयुर्वेदिक उपचारांचा राजा

ज्योतिर्मय साहित्य

कापूर फक्त पूजेसाठी पवित्र नसून, शरीरातील अनेक समस्या काही दिवसांत दूर करणारा नैसर्गिक उपाय आहे!

- कापूर घरातील नकारात्मकता दूर करतो
- शरीर-मन शांत ठेवण्याची अद्भुत क्षमता
- अँटी-बॅक्टेरियल, औषधी आणि त्वरित परिणाम करणारा घटक

चला जाणून घेऊ या अद्भुत फायदे

१) तणाव दूर करतो : कापराचा सुगंध मन शांत करतो. खोलीत कापूर ठेवला तर - तणाव कमी, मन प्रसन्न, रात्री उत्तम झोप

२) डोकेदुखीवर प्रभावी : कापूर + सुंठ + अर्जुनाची साल + पांढरं चंदन एकत्र बारीक करून कपाळावर लावा.

थोड्याच वेळात आराम जाणवेल!

३) स्नायू वेदना व खोकला आराम - मोहरी किंवा तिळाच्या तेलात कापूर टाकून मालिश करा.

- स्नायूंच्या वेदना कमी होतात, खोकल्यावर झटपट आराम

४) सर्दी-जंतुसंसर्गावर उपयोगी - गरम पाण्यात कापूर टाकून वाफ घेतल्याने सर्दी लगेच कमी होते.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) त्वचेसाठी उपयुक्त खोबरेल तेल + कापूर

- डाग कमी - त्वचा स्वच्छ

(तेलकट त्वचेसाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्या)

६) केस काळे व कोंड्यामुक्त : कापूर मिसळलेले तेल लावल्याने कोंडा कमी होतो व केस काळे राहतात.

७) हिवाळ्यात टाचांच्या भेगांसाठी - कोमट पाणी + कापूर पाय काही वेळ भिजवा  पाय मऊ होतात  भेगा बऱ्या होतात.

***

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### वटपौर्णिमा

वसा घेतला सावित्रीकडून
मनोभावे सखींच्या सोबतीने
वटपौर्णिमेची पूजा करते
घरासाठी सुख,संपत्ती,
आरोग्या,आनंद,समाधानासवे
अखंड सौभाग्य मागते

सात जन्माची सोबत
आहे आपली सखया
आनंदाने संसार करु
संकटकाळी न जाता
खचून एकमेकांचा सदा
हात हाती धरु

# निवृत्तीनंतरच आयुष्याचा खरा अध्याय सुरू होतो-मुकुंद फडके

ज्योतिर्मय साहित्य

सातारा - लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी-कुशी येथील सेवापूर्ती समारंभात ३२ वर्षे प्रामाणिक सेवा बजावणाऱ्या दिलीप (सावंत मामा) यांचा भावपूर्ण सत्कार ‘‘नोकरीच्या आयुष्याला एक दिवस पूर्णविराम मिळतो; मात्र निवृत्ती म्हणजे जीवनाचा शेवट नसून नव्या आयुष्याची सुरुवात असते. ज्ञानाच्या महामार्गावरील एका शाळेत तब्बल ३२ वर्षे निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि निरपेक्ष भावनेने सेवा बजावणारे दिलीप सावंत यांचे कार्य प्रेरणादायी आहे. मामा या शब्दात माया, जिव्हाळा आणि माणुसकी दडलेली आहे. निवृत्तीनंतरच आयुष्याचा खरा अध्याय सुरू होतो,‘‘ असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व निवृत्त संपादक मुकुंद फडके यांनी केले.

लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था, सातारा संचलित लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी-कुशी येथे शाळेचे शिपाई दिलीप खाशाबा सावंत (सावंत मामा) यांच्या ३२ वर्षांच्या अखंड सेवेनिमित्त आयोजित सेवापूर्ती सत्कार समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिरीष चिटणीस होते. यावेळी संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रमेश महामुलकर व श्रीनाथ सावंत यांनी तबला व पेटीच्या साथीवर स्वागतगीत सादर करून वातावरण प्रसन्न केले.




त्यानंतर दिलीप सावंत व त्यांच्या सौभाग्यवती निर्मला दिलीप सावंत यांचा संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

मुकुंद फडके यांनी आपल्या भाषणात सावंत मामांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, ‘‘एकाच संस्थेत एकाच पदावर ३२ वर्षे सेवा करून निवृत्त होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. अशा कर्मयोग्यांचा समाजाने गौरव करायलाच हवा. जीवनात कधी थांबायचे हेही प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे. आपण घेतलेले शिक्षण आणि आयुष्यातील अनुभव कधीच वाया जात नाहीत.‘‘ यावेळी त्यांनी सावंत मामा यांना ‘‘आता थांबायचे नाही‘‘ हे प्रेरणादायी पुस्तक भेट दिले. यावेळी शिल्पा चिटणीस म्हणाल्या, ‘‘शिक्षकांप्रमाणेच शिपाईही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असतो. सावंत मामांनी विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि मनापासून सेवा केली. त्यांच्या कार्याचा ठसा या शाळेच्या इतिहासात कायम राहील.‘‘

अध्यक्षीय मनोगतात शिरीष चिटणीस यांनी सावंत मामांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, ‘‘सावंत मामांचे इंग्रजी हस्ताक्षर अतिशय सुंदर होते. त्यांनी केवळ नोकरी केली नाही, तर शाळा आणि संस्थेच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले. या शाळेची सुरुवात त्यांच्या घरातून झाली, ही बाब माझ्यासाठी अभिमानास्पद आहे. त्यांनी आपल्या मुलगा आकाश आणि मुलगी आरती यांना उच्च शिक्षण देत आदर्श पालकत्वही निभावले. आज त्यांचा मुलगा संगणक अभियंता आहे. शाळेच्या प्रगतीसाठी खाशाबा सावंत, दिलीप सावंत आणि महामुलकर मामा यांनी घेतलेले कष्ट विसरता येणार नाहीत. ही शाळा केवळ शिक्षणच देत नाही, तर विद्यार्थ्यांना ध्येय आणि महत्त्वाकांक्षा देते. त्या महत्त्वाकांक्षेला आकार देण्यात शिक्षकांसह सावंत मामांचाही मोठा वाटा आहे.‘‘

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य माननीय संदीप शिंदे यांनी दिलीप सावंत यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमानिमित्त सेवानिवृत्त होण्यापेक्षा सेवा प्रवृत्त होणे अधिक चांगले असे सांगितले कार्यालयीन काम करीत असताना वेळेचे अचूक भान असणारी आणि शिक्षणावर नितांत प्रेम असणारे व्यक्तिमत्व असा दिलीप मामांच्या कार्याचा उल्लेख केला त्यांनी सांगितले ते जरी सेवक होते तरी विद्यार्थ्यांच्यावर चांगले संस्कार केलेल्या आहेत.

विजय यादव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ‘‘आज जो लोकमंगलचा वटवृक्ष उभा आहे, त्याचे रोप लावण्याचे काम सावंत मामांनी केले आहे. शाळेशी असलेले ऋणानुबंध त्यांनी आयुष्यभर जपावेत.‘‘ दत्तात्रय सावंत (पाटील) यांनी शाळेच्या सुरुवातीच्या काळातील आठवणींना उजाळा देताना सांगितले की, ‘‘खाशाबा सावंत यांनी शाळेसाठी जागा उपलब्ध करून दिली. त्याग आणि संघर्षातून ही संस्था उभी राहिली. सुरुवातीच्या काळात इमारतीला पाणी मारण्यापासून विविध कामे सावंत मामांनी एकहाती केली. पहिली सात वर्षे ते एकटेच कार्यरत होते. त्यांनी स्वतःला कधी शिपाई समजले नाही, तर कुटुंबप्रमुखाप्रमाणे विद्यार्थी आणि शिक्षकांना मार्गदर्शन केले.‘‘ सत्काराला उत्तर देताना दिलीप सावंत भावूक होत म्हणाले, ‘‘नोकरीला लागल्यापासून आजपर्यंतचा प्रवास मला शिकवणारा आणि समृद्ध करणारा ठरला. या शाळेने मला प्रेम, स्नेह आणि जीवनाला दिशा दिली. शिक्षक, मुख्याध्यापक, सहकारी आणि विद्यार्थ्यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्यामुळे माझा ३२ वर्षांचा सेवाप्रवास अविस्मरणीय ठरला.‘‘ प्रास्ताविकात शशिकांत जमदाडे यांनी शाळेच्या सुरुवातीच्या दिवसांच्या आठवणी सांगताना नमूद केले की, ‘‘एका पिशवीतील दप्तरांपासून सुरू झालेली ही शाळा आज मोठ्या उंचीवर पोहोचली आहे. सुरुवातीपासून प्रत्येक छोट्या-मोठ्या कामात सावंत मामांचा सहभाग होता. त्यांच्या सेवाभावामुळे शाळेच्या प्रगतीला मोठी चालना मिळाली. त्यांच्या भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.‘‘ कार्यक्रमाचे प्रास्ताविक शशिकांत जमदाडे यांनी केले. सूत्रसंचालन शशिकांत जाधव यांनी, तर आभार नितीनकुमार कसबे यांनी मानले. कार्यक्रमास राहुल घोडके, रमेश महामुलकर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, नागेवाडी-कुशी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवापूर्ती समारंभ भावनिक, कृतज्ञतापूर्ण आणि संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.



## कुटुंबासारखेच शालेय जीवनात शिक्षक आणि मित्र महत्त्वाचे-म. भा. चव्हाण

ज्योतिर्मय साहित्य

सातारा - विद्यार्थ्याला कुटुंबा सारखेच शालेय जीवनात शिक्षक शिस्त लावतात त्याचबरोबर मित्रही महत्वाचे आहेत असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक म.भा. चव्हाण यांनी केले.

लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था, सातारा, आदिश जैन फाउंडेशन आणि अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे शाखा सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘‘साहित्यिक आनंद मेळा २०२६‘‘ अंतर्गत आयोजित तिसरे व चौथे सत्रात ज्येष्ठ साहित्यिक म .भा चव्हाण बोलत होते.

यावेळी लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिरीष चिटणीस, सचिव शिल्पा चिटणीस, आदिश जैन फाउंडेशनच्या अध्यक्ष मृणाल जैन, विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय यादव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. चव्हाण पुढे म्हणाले विद्यार्थ्याला कुटुंब संस्था ही महत्त्वाची असते मात्र जीवनाला आकार शाळेतील शिक्षकच देतात मित्र हे चांगल्या सवयी लावण्याचा साठी मदत करतात . संस्कारांची जपणूक आणि नातेसंबंध दृढ करण्याची गरज याविषयी त्यांनी प्रभावी विचार मांडले. यावेळी नीलिमा फाटक आणि मृणाल जैन यांनीही कुटुंब व्यवस्थेतील विविध पैलूंवर आपले मनोगत व्यक्त केले.

चौथ्या सत्रात ‘‘स्वच्छता : वैयक्तिक व सामाजिक‘‘ या विषयावर डॉ. मुदुला खेरनार-कुलकर्णी यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.यावेळी विद्यार्थ्यांना अनेक प्रश्न विचारून त्यांच्याकडून खेळाच्या माध्यमातून उत्तरे जाणून घेतली यावेळी विद्यार्थ्यांना बक्षीसही देण्यात आली . या सत्राच्या गटप्रमुख म्हणून राजश्री सोले यांनी भूमिका बजावली. तसेच पुष्पा कुलकर्णी, वंदना घाणेकर आणि वंदना ललवाणी यांनी स्वच्छतेचे वैयक्तिक व सामाजिक जीवनातील महत्त्व विषद केले. कार्यक्रमास उदय जाधव, काकासो निकम, बाळकृष्ण इंगळे, भास्कर जाधव, संगीता कुंभार, देवराम राऊत, प्रतिभा काळे, सतीश पवार, बाळकृष्ण फडतरे, चंद्रकांत देवगड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुलाब पठाण यांनी केले उपस्थिताचे आभार वैशाली वाडीले यांनी मानले .



# सिडकोच्या विघ्नहर्ता गणेश मंदिरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : येथील सिडकोच्या विघ्नहर्ता गणेश मंदिरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. आज संपूर्ण दिवसभर मुहूर्त असल्याने एन-३, एन-४ परिसरातील महिलांनी सकाळपासून मंदिरात वडाची पूजा अर्चा करण्यासाठी गर्दी केली होती. विघ्नहर्ता गणपती मंदिराचे पुजारी श्रीमान. पांडुरंग जोशी यांनी आलेल्या महिलांना यथासांग पूजा सांगीतली. आलेल्या सर्व महिलांनी मनोभावे वडाची पूजा अर्चा केली.

नैवेद्य आरती केली त्यानंतर आलेल्या इतर महिलांना वानवसा केला. प्रत्येकींनी एकमेकींची ओटी भरली मनोभावे नमस्कार केला नी आशीर्वाद घेतला. त्यानंतर मंदिरात आलेल्या प्रत्येक महिला भक्तांची पाऊले आपल्या घरी परतली ती एका आत्मिक समाधानानी हे बाकी खरं...

## कवी विवेक द. जोशी यांना मानद विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर - कवी विवेक द. जोशी यांना एशियन इंटरनॅशनल कल्चर रिसर्च युनिव्हर्सिटी या संस्थेच्यावतीने कविता, साहित्य आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मानद विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे.

विवेक जोशी यांनी राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावरील विविध साहित्य संमेलनांमध्ये आपल्या कवितांचे प्रभावी सादरीकरण केले आहे. त्यांच्या बालकवितेचा बालभारतीच्या उर्दू माध्यमातील इयत्ता पहिलीच्या द्वितीय भाषा मराठी अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला होता. ही त्यांच्या साहित्यकार्यातील एक महत्त्वपूर्ण उपलब्धी मानली जाते.

त्यांचे आजपर्यंत सहा कवितासंग्रह आणि एक कथासंग्रह प्रकाशित झाले असून, आणखी एक कवितासंग्रह आणि एक ललित लेखसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. साहित्य क्षेत्राबरोबरच त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांमध्येही उल्लेखनीय कार्य केले आहे.

इंटरनॅशनल ॲक्रेडिटेशन ऑर्गनायझेशन संलग्न संस्थेच्या वतीने दि. २७ जून २०२६ रोजी बेंगळुरू येथे आयोजित समारंभात विवेक द. जोशी यांना कविता, साहित्यसौंदर्य आणि सामाजिक सेवेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही मानद पदवी प्रदान करण्यात आली.

ही मानद पदवी त्यांच्या साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याची दखल घेणारी असून, साहित्य क्षेत्रासाठी अभिमानाची आहे आहे.कवी विवेक जोशी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## वानोळा



प्रा. प्रमोद दसरे, पुणे. मो.नं. 9850183909

घरी चाललाच आहेस तर जातांना वानोळा घेऊन जा. रिकाम्या हाताने जाऊ नये.!!
वरील वाक्य ऐकले आणि वानोळा शब्द मनात फिरत राहिला.
नकळत मन बालपणाच्या आठवणीत गेले तेव्हा असली चॉकोलेट, कॅडबरी नाही मिळायची हातावर.
किंवा अशी घसघशीत किमतीची चकचकीत मिठाईची पाकिटे देखील नाही मिळायची पाहुण्यांना निघताना..
तेव्हा पाहुण्यांना निरोप मिळायचा तो भुईमूगाच्या शेंगा, मक्याची कणसे, घरी बनवलेल्या पायली दोन पायली डाळी, ओल्या हरभऱ्याची जुडी, शेतात पिकलेली ताजी हिरवीगार मेथी- कोथंबीरची जुडी. आणि असलेच बागायतदार घर तर टोपलीभर पेरू, पपई सारखी फळे, आणि अजून श्रीमंत घरात गेले की मिळायचा केळीचा घड, तोही पूर्ण किमान दहा डझनभर केळी लपेटलेला.
मग घरी येऊन जोवर तो वानोळा पुरायचा, तोवर त्या नातलगांची आठवण रोज निघायची...
तो वानोळा केवळ जिन्नस नसायचा, ती माया असायची. प्रेम असायचे, हृदयातून पोटा पर्यंत जाणारे... वाळवणाचे दिवस असले की, मग तर बघणेच नको. पापड, कुरडई प्रत्येक घरात व्हायची, तरी शेजार पाजारी वानोळा जायचा.
ती प्रत्येकाच्या हातची चव चाखण्यात ही वेगळाच आनंद असायचा..
सगळ्यात विशेष म्हणजे कैरीचे लोणचे. मसाला तोच, कैऱ्या त्याच, पद्धतही तीच.. तरी प्रत्येक घरातल्या लोणच्याचा सुगंध ही वेगळा आणि चवही वेगळी... थोडक्यात काय तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या वानोळ्या च्या निमित्ताने माणसे आणि घर परस्परांच्या हृदयात राहायची...
एखादयाची गाय किंवा म्हैस व्याली तरी खरवस संपूर्ण गल्ली तरी खायची...
आज शेजारच्या घरात बाळ जन्माला येते तरी आपल्याला बारशाला कळते. हे वास्तव आहे.
अशावेळी खरेच वाटते, आपण खरच सुधारतो आहोत की माणसां पासून दुरावतो आहोत...
जोवर वानोळा होता तोवर माणूस भोळा होता.
माणूस शहाणा सुशिक्षित झाला, वानोळ्याची लाज वाटायला लागली आणि मने दुरावत गेली....
मग वानोळ्याची जागा मिठाईच्या पाकिटांनी आणि कॅडबरी सेलिब्रेशनने घेतली....
जितक्या लवकर कॅडबरी विरघळते तितक्या लवकर माणूस माया, स्नेह विसरायला लागला..
सगळे कसे प्रॅक्टिकल होत गेले आणि इमोशन्स फक्त सिनेमाच्या कथेमध्येच बंद झाल्या..
तिकीट काढून आम्ही डोळ्यात आसवे आणायला लागलो आणि कथा कादंबऱ्यात नाती वाचायला लागलो.. माहेरवाशीण आता केवळ गोष्टीं मधेच सापडते, तिच्या गाठोड्यात वानोळा देणारी माय देखील पडद्याआड जाऊ पाहते.
तरी अजूनही तुमच्या माझ्या सारख्यांची आई निघताना पिशवीत काही ना काही टाकते, हाच वानोळा असतो.
देत राहणाच्या संस्काराचा, वाटून खाण्याच्या वृत्तीचा, लक्ष्मीची ओटी भरून पाठवणी करण्याचा, दूर असलो तरी स्मरणात राहण्याचा मार्ग असतो वानोळा
आज असाच शब्दरूपी वानोळा पाठवत आहे.
पोहचला की आस्वाद घ्या आणि गोड माना...
पण तो अस्सल वानोळा खरेच कुठेतरी हरवला हे निश्चित...!!

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### "महाजनो येन गत: स पंथ:" ...

अश्वत्थामा हतः इति नरो वा कुञ्जरो वा॥
अश्वत्थामा मरण पावला आहे; परंतु तो मनुष्य आहे की हत्ती, हे स्पष्ट नाही.
३. युधिष्ठिरांचे धर्मसंकट
युधिष्ठिरांनी असत्य बोलण्यास नकार दिला होता. तेव्हा श्रीकृष्णांनी व्यापक धर्माचा विचार करण्यास सांगितले.
महाभारतात एक तत्त्व सांगितले आहे –
भवेत् सत्यमवक्तव्यं वक्तव्यमनृतं भवेत्।
यत्रानृतं भवेत् सत्यं सत्यं चाप्यनृतं भवेत्॥ – महाभारत, उद्योगपर्व
काही प्रसंगी सत्य बोलणे उचित नसते आणि असत्य बोलणेही धर्मरूप ठरते; कारण परिस्थितीनुसार सत्य आणि असत्य यांचे स्वरूप बदलू शकते.
४. आपद्धर्म (संकटकालीन धर्म)
धर्मशास्त्रात आपद्धर्म मान्य केला आहे.
संकटसमयी सामान्य नियमांपेक्षा व्यापक कल्याण महत्त्वाचे मानले जाते.
आत्मानं सततं रक्षेद् दारैरपि धनैरपि।
संकटसमयी स्वतःचे, समाजाचे व धर्माचे रक्षण प्रथम करावे.
युद्धात अधर्माचा पराभव करण्यासाठी कधीकधी कठोर निर्णय घ्यावे लागतात, हा श्रीकृष्णांचा दृष्टिकोन होता.
५. भगवद्गीतेतील संदर्भ
भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात –
स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते॥
– भगवद्गीता २.३१
क्षत्रियासाठी धर्मयुद्धापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे काहीही नाही.
६. या प्रसंगाचे तात्त्विक विवेचन
हा प्रसंग पुढील प्रश्न उपस्थित करतो–
वैयक्तिक सत्य मोठे की समाजहित?
नियम मोठा की धर्माचा हेतू?
सत्याचे अक्षर महत्त्वाचे की त्यामागील उद्देश?
श्रीकृष्णांचा दृष्टिकोन असा दिसतो की–
"धर्म म्हणजे केवळ नियमांचे पालन नव्हे; तर अधर्माचा नाश करून लोककल्याण साधणे होय." म्हणूनच महाभारतात धर्माची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे– क्रमशः.......



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आई' (मायेची पैठणी)

ज्याच्याशिवाय नात्यांचं हे महावस्त्र जन्मालाच येऊ शकत नाही, असा या वस्त्रातील एक अनोखा आणि सर्वात मौल्यवान पदर म्हणजे 'आई'. नात्यांच्या या वस्त्रातील ती खरी सुवर्णमयी 'पैठणी' असते. विधात्याने अत्यंत कुशलतेने आणि निगुतीने घडवलेली!
ज्यामुळे आपण या जगात येतो आणि आपल्याला आपली ओळख मिळते असे एक नाते म्हणजे आई. प्रत्यक्ष परमेश्वराने सुद्धा जेव्हा पृथ्वीवर अवतार घेतला, तेव्हा त्यालाही आईमुळेच सर्वश्रेष्ठ ओळख मिळाली. राम झाला कौसल्यानंदन, कृष्ण झाला देवकीनंदन. अंजनेय(हनुमंत) आणि राधेय (कर्ण) हे देखील आपल्या आईच्या नावामुळेच ओळखले गेले.' "आईची महती" एवढी थोर की जगातल्या अनेक थोर साहित्यिकांनी तिच्यावर भरभरून लिहिले.
'आई' हा शब्द जरी उच्चारला, तरी डोळ्यांसमोर प्रेमाची अशी एक मूर्ती उभी राहते जी वैश्विक आहे. माणूस असो वा प्राणी, भारत असो की जगाच्या पाठीवरचा कुठलाही देश; आईचे प्रेम सर्वत्र सारखेच असते. म्हणूनच मी आईला प्रेमाची वैश्विक मूर्ती म्हणतो. इतरांचं प्रेम भलेही 'माया' असेल, पण तिचं प्रेम म्हणजे 'आभाळमाया'! आपल्या मुलांवर असलेली तिच्या प्रेमाची शाल केवळ ऊब देत नाही, तर एक अभेद्य कवच बनून आयुष्यभर त्यांचे रक्षण करते. "घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलापाशी..." तशी आई शरीराने कुठेही असली, तरी तिचे चित्त मात्र सदैव आपल्या लेकरापाशीच असते.
परमेश्वराने तिला पृथ्वीवर पाठवतानाच तिच्या काळजात 'अखंड माया' भरून पाठवली आहे. आई म्हणजे परमेश्वराचे दुसरे रूप. कोणीतरी खूप छान म्हटलं आहे की, परमेश्वराला सगळीकडे उपस्थित राहणे शक्य नाही म्हणून त्याने आईला पाठवले आहे. ती स्वतः उपाशी राहील, पण लेकराचं पोट भरल्याशिवाय तिचं पोट भरत नाही. तिची स्वतःची झोप होवो न होवो, आपल्या तान्हुल्याची झोप नीट व्हावी म्हणून तिची धडपड असते. "निजल्या तान्ह्यावरी माउली दृष्टी सारखी धरी" अशी तिची अवस्था असते. क्रमशः....

# जीव आणि अजीव स्वतंत्रच भौतिकतेच्या मागे लागून उपयोग नाही

ज्योतिर्मय साहित्य

एक विचार असा आहे, जे होत आहे ते होऊ द्या. जीवन जसे चालले आहे तसे चालू द्या. त्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण करु नका. प्रकृतीची लीला, नियतीची इच्छा समजून त्याकडे त्रयस्थ, तठस्थ भावनेने पहा. हाच सुखाचा मार्ग असू शकतो.


चांगले किंवा वाईट काहीच नाही. होत आहे ते होऊ देणे. येथे हरवून जावे असे तुमचे काय आहे? सर्व प्रकृतीचे आहे, निसर्गाचे आहे. आपला काहीच अधिकार नाही. म्हणून प्रत्येक घटनेचे फक्त साक्षी व्हा. सुख-दुःखाच्या पलीकडे जाण्याचा हाच मार्ग आहे.

प्रत्येक जीव हा त्याचा स्वतःचा असतो. कारण चैतन्य स्वतंत्र असते. ते इतर कोणाच्याही मालकीचे नसते. तसेच प्रत्येक अजीव म्हणजेच भौतिक पदार्थ हा त्याचा स्वतःचा असतो. जीव आणि अजीव ह्या दोन स्वतंत्र राशी विश्वामध्ये अस्तित्वात आहेत, याशिवाय तिसरा पदार्थ नाही. आणि मुख्य म्हणजे हे दोन्हीही स्वतः स्वतंत्र अस्तित्वात आहेत. जीव अजीवाचा कधीही होऊ शकत नाही आणि अजीव हा कधीही जीवाचा होऊ शकत नाही हा फार महत्त्वाचा सिद्धांत आहे. आपण जे



पंचमहाभूत म्हणतो तेच अजीव किंवा भौतिक पदार्थाचे सर्व प्रकार.

परंतु एक सत्य आहे की जीव हा अजीवाच्या सहाय्याने जीवन जगतो. जीवामध्ये चैतन्य असते म्हणून अनेक प्रवृत्ती असतात. अजीवामध्ये चैतन्याचा अभाव असल्यामुळे प्रवृत्ती नसतात. मात्र अजीवाचे काही मूलगुण असतात. जसे स्पर्श, वर्ण, गंध, रस अर्थात गरम किंवा थंड असणे, कोणता तरी रंग असणे, त्याला चव असणे, नियमित किंवा अनियमित आकार असणे, आणि खंडित होणे किंवा एकत्र जुळणे. हे सर्व अजीव पदार्थाच्या मूळ लहानात लहान सूक्ष्म कणाचे गुणधर्म असतात. हे सर्व एकत्र होऊन मोठा पदार्थ होतो.




चैतन्य आत्मा जेव्हा संसारात असतो, तेव्हा कर्मजनीत अवस्थेमुळे त्याच्या काही प्रवृत्ती असतात. संसारात असलेल्या जीवाला जीवन जगण्यासाठी वस्तूंची आवश्यकता पडते. म्हणजेच तो अजीवाच्या सहाय्याने जीवन जगतो. हा जीव आणि अजीव यांच्यातील परस्पर सह-अस्तित्वाचा सिद्धांत आहे. इतके माहीत असल्यानंतरही मनुष्य भौतिक वस्तूंचा लोभ, मोह, संग्रह करतो. भौतिक पदार्थांच्या, वस्तूंच्या प्राप्तीसाठी जीवनातील महत्त्वाचा सर्व वेळ खर्च करतो. त्याचे कारण हेच की तो भौतिकते मध्ये सुख शोधत असतो.

परंतु खूप मेहनत, कष्ट आटापिटा केल्यानंतरही ज्यावेळेस तो भौतिकतेच्या मागे थकून भागून अखेर स्थिरावतो तेव्हा त्याच्या लक्षात येतं की खरे सुख हे वस्तूंच्या मागे भौतिकतेच्या मागे पर-पदार्थाच्या मागे धावण्यात, पळण्यात, त्यांना मिळवण्यात नसून ते आपल्या अंतरात आहे. सुख हे समाधानात आहे. आपल्या मानण्यात आहे. समभावात जगण्यात आहे. म्हणजेच खरे सुख हे अंतरातील संतोष वृत्ती मध्ये आहे. म्हणून असे म्हणावे वाटते की निसर्ग आणि नियतीच्या इच्छेनुसार जीवन जसे चालले आहे तसे चालू द्या. त्यात फार बाधा उत्पन्न करण्याचे कारण नाही. अविचल आणि संतुलित, संतोष आणि समाधानी, अर्थात समभावाने जीवन जगण्यातच खरे सुख, समाधान आहे हे जाणून घ्यावे.

# स्त्री जातीचा गौरवाभिमान - ‘‘महिला पोलीस’’

ज्योतिर्मय साहित्य

माझी वर्दी माझा अभिमान राखते मी
स्वीत्वाची आन-बान-शान रक्षीण्या समाजाला
तुडवीते पायदळी नराधमांना

आपल्या भारत देशाला सुंदर संस्कृतीचा वारसा लाभला आहे. आणि आपल्या भारतीय संस्कृतीत स्वीला ‘‘लक्ष्मी रूप‘‘ म्हणून ओळखले जाते. लक्ष्मी रूप म्हणून संबोधले जाते. बाई आहे तर घराला घरपण आहे. स्त्री म्हटले कि चूल मूल म्हणनारा समाज, स्त्री जातीला चालीरितींच्या साखळदंडात जखडून ठेवला आहे. मात्र तीच स्त्री रूढी परंपरेच्या साखळ दंडाला तोडत स्वतः ची सुटका स्वतः करून घेत, चुलमूल सांभाळत, सर्व जबाबदाऱ्या पार पाडत आज साखळ दंडातल्या त्याच स्त्री शक्तीचा एक नवा अध्याय समाजासमोर ठेवला आहे. ती स्त्री जी जन्मदाता आहे. प्रत्येक भूमिका चोखपणे निभावणारी व पार पाडणारी स्त्री शक्ती आहे. स्त्री जातीचा गौरव, गौरवाच्या अभिमानाचा अध्याय म्हणजे ‘‘महिला पोलीस‘‘.



आज समाजात महिला पोलीस या धगधगत्या धारदार शस्त्ररुपी व्यक्तिमत्त्वाला एक ‘‘समाज सुरक्षा कवच‘‘ म्हणून ओळखले जाते आहे. पोलीस हे क्षेत्र केवळ पुरुषां पुरतेच मर्यादित नाही तर या क्षेत्रात महिला पोलीसही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उत्तम कामगिरी बजावत आहेत. समाज रक्षणासाठी महिला वर्दीत उभी आहे. समाजात घडणाऱ्या विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी, नराधमांना वेठीस धरण्यासाठी महिला सुरक्षा पथक आज अविरत चालत आहे. स्त्री जातीला न्याय मिळवून देत आहे. महिलांच्या सशक्ततेचे एक ज्वलंत उदाहरण म्हणजे महिला पोलीस.




पीडित महिलांना धीर देत वर्दीतील बाईपणाची ओळख सांगणारे व्यक्तीमत्व म्हणजे महिला पोलीस. महिला पोलीस म्हणजे खुर्चीवर बसून भूषविणारे वा गाजवीणारे केवळ एक पद नाही. तर समाज रक्षणाचे सशक्त व निडर एकमेव साधन होय. स्त्री आदिशक्तीची खरी ओळख होय. आज महिला आकाशी यशाची गरुडझेप घेत आहेत. नव्या स्वप्नांची नवी उमेदिची पंखे लावून निडर उडत आहेत, विहार करताहेत. महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला खुलेआम वाचा फोडत प्रत्येक आया बहिणींना न्याय मिळवून देत आहेत. महिला पोलीस ह्या आई, मुलगी, बहीण, पत्नी, सून या नात्यातील भूमिका पार पाडताना आपण बघतो.

आपल्या तान्ह्या बाळाला स्तनपान करता करता ड्युटीचा एक फोन कॉल आला की लगेच

कार्यतत्परतेसाठी धावणारी ती ‘‘आई‘‘ महिला पोलीस म्हणून उंबरठ्या बाहेर पाऊल टाकते. आपला संसार मूलबाळ या सर्व गोष्टी कधी कधी पणाला ही लावाव्या लागतात. पण, तरीही आपल्या कर्तव्यात कर्तव्य दक्षता दाखवत स्त्री जातीचा गौरवाभिमान प्रत्येकांच्या मनावर उमटवत आपल्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारी ही रणरागिनी म्हणजे महिला पोलीस. सणावाराला धर्माधर्मात सलोखा राखून ठेवणारी ही नारीशक्ती सर्वांवर भारी पडते. आपल्या कडक आवाजात, देहबोलीतील निडरपणा, कटाक्ष नजरेने सर्वांना धाक दाखवणारी ही योद्धा रणभूमीला गाजवणारी धगधगती ज्वाला आहे.

कधी कधी सणावाराला घरात गोड धोड असे काहीच न बनवता आया-बहिणीच्या, समाजाच्या, प्रत्येकाच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर राहते. अतिशय बारकाईने प्रत्येक गोष्टींचा छडा लावत शोध घेत प्रत्येक क्षणी तपासासाठी अग्रेसर राहते. म्हणूनच आज समाजात महिला पोलीस या वर्दीकडे व वर्दीतील या रणरागिणीकडे गौरवाने बघितले जाते आहे.

# म्युनिकची पहिली ओळख (भाग दुसरा)

ज्योतिर्मय साहित्य

म्युनिक एअरपोर्टवर उतरलो तेव्हा एप्रिलची अखेर असूनही हवेत हलकासा गारवा होता. आकाश स्वच्छ निळे, ऊन कोवळे, आणि वारा अंगाला झोंबणारा. आपण खरंच युरोपा मध्ये आलो आहोत याची पहिली जाणीव झाली ती इथल्या शिस्तबद्ध शांततेने. रांगा, स्वच्छता, आणि प्रत्येक गोष्टीत एक प्रकारची नीटनेटकी सुबकता.



म्युनिक जर्मनीच्या बव्हेरिया () प्रांताची राजधानी. इथे जुन्या जगाचा रुबाब आणि नव्या जगाची चकाकी एकत्र नांदते. एका बाजूला शतकानुशतके उभे असलेले दगडी चर्च आणि राजवाडे, तर दुसऱ्या बाजूला सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे मंदिर.

हॉटेलवर सामान टाकून, थोडी विश्रांती घेऊन आम्ही शहर पाहायला बाहेर पडलो. यू-बान - (म्युनिकची मेट्रो), ने आम्ही फिरलो. ती इतकी अचूक वेळेवर चालते की घड्याळ लावून घ्यावे. तिकिटाच्या मशीनशी थोडी झटापट झाली, पण एका स्थानिक आजोबांनी हसतमुखाने मदत केली. भाषा जरी वेगळी असली, तरी माणुसकीची भाषा सगळीकडे सारखीच असते, हे पुन्हा एकदा पटले.

**मारिएनप्लात्स आणि शहराचे हृदय (भाग तिसरा)**

म्युनिकचे हृदय म्हणजे मारिएनप्लात्स शहराचा मध्यवर्ती चौक. इथे पाऊल टाकताच समोर उभा राहिला तो भव्य, कोरीव दगडी न्यू टाऊन हॉल. गॉथिक शैलीतल्या त्या इमारतीचे प्रत्येक टोक, प्रत्येक पुतळा इतका बारकाईने घडवलेला, की पाहतच राहावे. मान वर करून त्या उंच मनोऱ्यांकडे बघताना मान दुखेपर्यंत आम्ही पाहत होतो.




बरोबर अकरा वाजता त्या मनोऱ्यावरचे प्रसिद्ध ग्लॉकेन्श्पील सुरू झाले. घंटांच्या मधुर नादात रंगीबेरंगी लाकडी बाहुल्या फिरू लागल्या. राजाच्या लग्नाचा सोहळा आणि नर्तकांचे नाच त्या यांत्रिक बाहुल्यांमधून जिवंत होत होते. खाली जमलेली शेकडो माणसे मान वर करून, मोबाईल उंचावून हा सोहळा टिपत होती. काही मिनिटांचा तो खेळ, पण शतकभराची कारागिरी त्यात भरलेली.

ही जागा खरंच एखाद्या पोस्टकार्डसारखी वाटते. इथल्या प्रत्येक इमारतीची कलाकुसर इतकी सुंदर आहे, की आपण नुसते पाहतच राहतो. मला अशा जागा खूप आवडतात, जिथे इतिहास आणि रोजचं जगणं एकाच वेळी नजरेस पडतं.

आणि या चौकाचा इतिहास तर थक्क करणारा आहे. आज आपण ज्या दगडी फरशीवर उभे आहोत, तीच जागा गेली सुमारे आठशे-साडेआठशे वर्षे म्युनिकचे हृदय राहिली आहे. इ.स. ११५८ साली, म्हणजे आपल्या यादवकालीन देवगिरीच्याही आधीच्या काळात, हेन्री द लायन नावाच्या राजाने हे शहर वसवले, आणि तेव्हापासूनच मारिएनप्लात्स हा इथला मध्यवर्ती चौक आहे. मध्ययुगात इथे धान्याचा बाजार भरत असे, घोडेस्वारांच्या रंगतदार स्पर्धा होत असत आणि गंमत म्हणजे, टाऊन हॉलवरच्या त्या ग्लॉकेन्श्पीलमधल्या नाचणाऱ्या बाहुल्यांची कल्पनाही याच जुन्या स्पर्धांवरूनच सुचली आहे. आजही म्युनिकमधली सगळी अंतरे याच चौकापासून मोजली जातात. इतक्या शतकांचा साक्षीदार असलेल्या या जागेवर उभे असताना, आपण इतिहासाच्या एका जिवंत पानावर पाऊल ठेवल्यासारखे वाटत होते.

मारिएनप्लात्सच्या मधोमध मारिएनसॉइले मेरीचा सोनेरी पुतळा असलेला स्तंभ उभा आहे. त्याभोवती कबुतरांचा थवा, रस्त्यावरचे कलाकार, आणि जिलॅटो (इटालियन आइस्क्रीम) खात फिरणारे पर्यटक. मग काय! आम्हीही जिलॅटो घेतले. आणि त्यांच्यात सामील झालो.

एक प्रकारची उत्साही, जिवंत गजबज तिथे भरून राहिली होती. मारिएनप्लात्सची भव्य सुंदरता मनात आणि डोळ्यांत साठवून आम्ही पुढे चालू लागलो.

(क्रमशः)

# ‘मड डे’ एन्जॉय करू चला....

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

पावसाचे किंवा मुळाशी साठलेले पाणी जमिनीत खोलवर नेऊन पोहोचवते त्यामुळे किती तरी काळ या झाडांना पाणी मिळते आणि ती टिकून ताहतात, फळे,फुले देतात.माती वनस्पतींना वाढण्यासाठी आवश्यक पोषक तत्त्वे पुरवते.तीपर्यावरणाचे संतुलन

राखते. माती पाणी साठवते आणि भूजल वाढवते. मातीमुळे झाडे वाढतात, त्यामुळे ऑक्सिजन निर्माण होतो,जो सर्व पक्षी, प्राणी आपल्याला श्वास घेण्यासाठी,जिवंत राहण्यासाठी अत्यंत गरजेचा आहे. म्हणजेच त्यामुळेच आपण जिवंत राहतो.शेतकरी शेती करतात म्हणजे मातीत दिवसभर कष्ट करतात. मातीची सुपीकता टिकून राहावी म्हणून विविध प्रकारची खते घालतात,त्यामुळे आपल्यालापोळी,भाकरी,भाज्या,भात, डाळी, उसळी वगैरे खायला मिळतात.

घर बांधण्यासाठी लागणाऱ्या विटा, सिमेंट हे सुद्धा मातीमुळेच बनते.म्हणजेच आपल्याला लागणाऱ्या अन्न,वस्त्र,निवारा या तिन्ही गरजा या मातीमुळेच पूर्ण होतात

ही माती इतकी गुणकारी आहे की तु ऐकूनही थक्क होशील. बोलता बोलता आबांच्या पायाच्या करंगळीवर ,बोटावर त्यांच्या हातातील विळा करंगळीवर पडला. आणि थोडेसे रक्तही आले. ते पाहून सिया ओरडलीच, थांबा आबा, मी घरात जाऊन फर्स्टएड बॉक्स आणते. तुम्ही आधी डेटॉल लावून स्वच्छ

करा आणि बँडेड बांधा बरं! तिचे बोलणे संपायच्या आत आबांनी माती किंचित ओलसर करून त्यावर लेप लावला सुद्धा! आबा! हे काय करताय? इन्फेक्शन होईल ना तुम्हाला! आबा म्हणाले,काळजी नको करुस,ही माती इतकी औषधी,गुणकारी असते, इतकी पॉवर असते की कितीही मोठी जखम असली तरी ती या मातीमुळे भरते.काही प्रकारची माती त्वचारोगांवर वापरली जाते. मुलतानी मातीचा लेप सौन्दर्य वाढवतो. मातीचे लेप शरीराला थंडावा देतात.नैसर्गिक उपचार पद्धतींमध्ये मातीचा वापर होतो.

आपण तो पावनखिंड सिनेमा पाहिला होता,तो आठवतो ना? त्यातली लढाई आठवतेय ? त्यात कित्ती सैनिकरक्तबंबाळ झाले होते किनई! खरंच आबा, त्यांना कित्ती बँडेड, बँडेज लागले असेल ना?

नाही ग शोनल, तेच तर सांगतोय, इतक्या सैनिकांना कुठले इतके बँडेज बांधायला वेळ तरी होता? ते अशावेळी फक्त जमिनीवरची माती सगळ्या जखमांवर घट्ट दाबून लावत असत. त्याने आपोआप जखमा बऱ्या होत असत. मागे आज्जीला डोळ्याला रांजणवाडी झाली होती,तेंव्हा आज्जीने तुळशीतली माती लावली होती ना डोळ्याला,आठवले का?तेंव्हा आज्जीने पण सांगितले होते ना, तुळशीतली माती थंड



असते,त्यामुळे उष्णता कमी होते डोळ्यातली,त्यामुळे ती बरी होते हो ना?

आता सियाला पटत होते हळूहळू.

आणि बरकां सिया, युद्धावर जाताना सगळे सैनिक आपल्या देशाची माती नमस्कार करून अभिमानाने हाताने कपाळी लावून मगच युद्धाला जायचे,आपल्याला आपल्या भुमातेचा आशीर्वाद मिळाला म्हणून जोशात जाऊन विजयी होऊन यायचे. ही जमीन, माती म्हणजे आपली आईच असते. तिच्या कुशीत आपण जगतो, वाढतो. आणि मातीच्या गुणांचे महत्व समजल्यामुळेच आता मातीची कितीतरी आकर्षक भांडी बनवतात ना स्वयंपाकासाठीसुद्धा. मग ती घाण असती,तर त्यात कुणी अन्न शिजवले असते का? ते खाल्ले असते का? त्यातील थंडगार पाणी प्यायले असते का? खरंच की आबा,हे तर लक्षातच नव्हते आले.

माती गुणकारी आहे म्हणून तर आमच्या स्कुल मध्ये मड डे साजरा करतात ना! त्यादिवशी सगळे चिखलात खेळले, चिखलाने पेंटिंग्स काढले,मातीच्या वस्तू बनवल्या होत्या. आता सगळी मुले कुतूहलाने त्या दोघांच्या भोवती गोळा झाली. आणि लक्ष देऊन ऐकू लागली. मग आबांनांही जोश आला.

कुंभार मातीपासून मडकी, घडे, दिवे, मूर्ती तयार करतात. सण-उत्सवांमध्ये मातीच्या वस्तूंचा मोठा वापर होतो. आपण दिवाळीत मातीच्या पणत्या लावतो ना?

मातीच्या वस्तूंमुळे पर्यावरणालाही हानी होत नाही. फक्त इतकेच नाही,तुमच्या स्कुल मध्ये जसा मड डे सेलिब्रेट करतात ना तसेंच पूर्वी आपल्याकडेही होळी झाली की दुसऱ्या दिवशी लाकडे,गोवऱ्या जळून झालेल्या राखेत पाणी मिक्स करून त्याचा चिखल करून खेळायची परंपरा होती. अजूनही बऱ्याच ठिकाणी अजूनही खेळतात. त्यामागेही सायंटिफिक रिझन आहे बरका!हिवाळा ऋतू संपून नुकताच उन्हाळा सुरु होतो. त्या हवेतील बदलाचा एकदम त्रास होऊ नये आणि त्यानिमित्ताने

एकीची भावना वाढून आनंद वाढावा हाही उद्देश आहे. तसेंच आताही तुम्ही मुले

मोबाईल, संगणक आणि दूरदर्शनमध्ये अधिक वेळ घालवता, त्यामुळे निसर्गाशी असलेला संपर्क कमी होत आहे.मातीचे प्रकार, झाडांची वाढ, पर्यावरणाचे महत्त्व आणि निसर्गाचे संरक्षण याबद्दल मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाल्यामुळे शिक्षण अधिक प्रभावी बनते. यामुळे मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होते. म्हणून हा मड डे

साजरा करतात. यामुळे मुलांचा शारीरिक आणि मानसिक विकासही होतो. चिखलात धावणे, उड्या मारणे आणि खेळणे यामुळे शरीराचा व्यायाम होतो. मोकळेपणाने खेळल्यामुळे मन प्रसन्न राहते, आत्मविश्वास वाढतो आणि तणाव कमी होतो. उत्साह वाढतो,आनंद पण मिळतो. माती ही जीवनाचा पाया आहे. अन्न, निवारा, पर्यावरण आणि उद्योग या सर्वांसाठी माती अत्यावश्यक आहे.माती ही पृथ्वीवरील जीवनाचा आधार आहे. ती केवळ शेतीसाठीच नाही, तर मानवाच्या दैनंदिन जीवनातील अनेक गरजांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे मातीचे जतन करणे आणि तिचा योग्य वापर करणे ही आपली जबाबदारी आहे. आता सगळ्या मुलांना ते अगदी मनापासून पटलेले दिसत होते. गप्पा गोष्टी करताना झाडे लावली,आबानी मातीची घागर, भांडी,फळे,भाज्या, प्राणी,वगैरे खूप काही बनवायला शिकवले. त्यांना आज खूपच मज्जा आली होती. नेहमीच्या खेळापेक्षा काहीतरी नवीन करायला, शिकायला मिळाल्याचा आनंद खूप मोठा होता त्यांना! आता दिवाळीत सगळेजण येणार ना किल्ला बनवायला मदत करायला? आबांनी विचारले,तसे ‘‘हो आबा.. आम्ही नक्की येणार!‘‘ सगळेजण एका सुरात मोठ्ठ्याने ओरडले. आता सियाला आणि मित्रपरिवाराला मातीची महती समजली. सुरुवातीला मातीत हात घालायला घाण वाटणारी सिया तर चक्क मातीने, चिखलाने माखली होती. फ्रॉक पण चिखलमय झाला होता,पण आता कुणालाच त्याची फिकीर नव्हती,कारण मातीमुळे मिळालेला आनंदच इतका मोठा होता ना? आज्जी, मी उद्या स्कुलमध्ये जाणार आहे बरका!सियाने सांगितले,तशी आज्जी म्हणाली,तुला तर आवडत नाही ना घाण चिखलात खेळायला? आणि ड्रेस पण खराब होईल ना? नाही ग आज्जी,आत्ता आम्ही खूप धम्माल केली आबांच्या सोबत आणि सगळेच डाग घाण नसतात! आणि सर्फ एक्सेल आहे ना!शिवाय वॉशिंग मशिन्सुद्धा आहे...आज्जी आणि आबा एकमेकांकडे पाहून हळूच गालात हसले.

सौ. स्नेहा मुसरीफ,
पुणे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559